**जून ते ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत अतिवृष्टीमुळे व पुरामुळे शेती पिकांच्या/ शेत जमीनीच्या नुकसानीकरिता मदत देण्यासाठी निधी वितरीत करणेबाबत (पावसाळी हंगाम २०२३ आदेश क्र.२)...**

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीएलएस-२०२३/प्र.क्र.१९३/म-३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३० नोव्हेंबर, २०२३.

**वाचा :** १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२३/प्र.क्र.३४९/म-३, दि.२७.०३.२०२३
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.६७/म-११,दि.२४.०१.२०२३.
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. सीएलएस-२०२३/प्र.क्र.५२/म-३,दि.२२.०६.२०२३.
४) विभागीय आयुक्त, नाशिक यांचे पत्र क्र.मशा/कार्या-२/नै.आ/२०२३, ज-३, दि.२४.०८.२०२३,
५) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र.मशा-७(५)/नै.आ.व्य./कावि-३१३, ३८३, ३८८ व ४१४ /२०२३, दि.१२.०९.२०२३, दि.२०.१०.२०२३,दि.२६.१०.२०२३ व दि.२४.११.२०२३.
६) विभागीय आयुक्त, छ.संभाजीनगर यांचे पत्र क्र.२०२३/मशाका/नैआ/कावि, दि.१८.०९.२०२३
७) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. सीएलएस-२०२३/प्र.क्र.१९३/म-३,दि.३.१०.२०२३.
८) विभागीय आयुक्त, कोकण यांचे पत्र क्र.मशा/ कार्या-६/नै.आ./माहे जुलै, २०२३/ शे.पि.नुक./कावि-७६४५९३, दि.१३.१०.२०२३.
९) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. सीएलएस-२०२३/प्र.क्र.१६८/म-३, दि.०९.११.२०२३.

<u>प्रस्तावना</u>:

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ या सारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे याकरिता शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान (Input subsidy) स्वरूपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत देण्यात येते. तसेच, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या इतर मान्य बाबींकरिता देखील विहित दराने मदत देण्यात येते. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३, दि.२७.०३.२०२३ अन्वये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे निकष व दर विहित करण्यात आले आहेत. तसेच संदर्भ क्र.९ येथील दि.०९.११.२०२३ च्या शासन निर्णयानुसार शेतीपिकांच्या नुकसानीकरिता ३ हेक्टरपर्यंत मदत अनुज्ञेय करण्यात आली आहे.

जून ते ऑक्टोबर, २०२३ या महिन्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या व शेतजमिनीच्या नुकसानीसाठी विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडून दि.२४.०८.२३, विभागीय आयुक्त, छ.संभाजीनगर यांचेकडून दि.१८.०९.२०२३, विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडून दि.१२.०९.२०२३, दि.२०.१०.२०२३, दि.२६.१०.२०२३ व दि.२४.११.२०२३ च्या पत्रान्वये तसेच विभागीय आयुक्त, कोकण यांचे कडून दि.१३.१०.२०२३ च्या पत्रान्वये निधी मागणीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

**<u>शासन निर्णय</u>**:

जून ते ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व पूर परिस्थितीमुळे शेतीपिकांच्या व शेतजमिनीच्या नुकसानीसाठी बाधितांना मदत देण्याकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरानुसार एकूण **रु.१३६६१.०६ लक्ष** (**अक्षरी रुपये एकशे छत्तीस कोटी एकसष्ट लक्ष सहा हजार फक्त**) इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रात लेखाशीर्षनिहाय दर्शविल्याप्रमाणे वर अनुक्रमांक २ येथे नमूद दि.२४.०१.२०२३ अन्वये सूचित केल्यानुसार आवश्यकतेनुसार कार्यासन म-११ यांनी हा निधी वितरित करावा. जिल्हाधिकारी यांनी वर अनुक्रमांक २ येथे नमूद दि.२४.०१.२०२३ अन्वये सूचित केल्यानुसार या प्रस्तावाअंतर्गत असलेल्या सर्व लाभार्थ्यांची माहिती विहित नमुन्यात तयार करुन ती संगणकीय प्रणालीवर भरावी. ही माहिती भरतांना -

अ) चालू हंगामामध्ये यापूर्वी सर्व विभागांना शेतीपिकांच्या नुकसानीकरिता वितरीत करण्यात आलेल्या मदतीच्या निधीमध्ये या प्रस्तांवातर्गत मागणी करण्यात आलेल्या निधीचा समावेश नाही याची दक्षता घ्यावी. एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत देण्यात येत असल्याची खात्री करावी.

ब) शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि.२७.०३.२०२३ व दि.०९.११.२०२३ नुसार जिरायत पिके, बागायत पिके व बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी मदतीच्या विहित दरानुसार जास्तीत जास्त ३ हेक्टरच्या मर्यादेत असल्याची खातरजमा करण्यात यावी.

क) शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि.०९.११.२०२३ नुसार शेतजमीनीच्या नुकसानीकरिता मदत बिगर अल्प-भूधारक शेतकऱ्यांना देखील २ हेक्टर मर्यादेत अनुज्ञेय करण्यात आली असून शेतजमीनीचे नुकसान झाल्याचे प्राधिकृत अधिकाऱ्याने प्रमाणित करणे आवश्यक आहे.

३. वरील निधी खर्च करताना संदर्भाधीन सर्व शासन निर्णयातील सुचनांचे व निकषांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. ज्या प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी सदर निधी खर्च करण्यात यावा. ही मदत देताना केंद्र शासनाने चक्रीवादळ, पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तीकरिता विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता होत असल्याची खात्री सर्व संबंधितांनी करावी. तसेच राज्य शासनाने घोषित केलेल्या अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीकरिता अतिवृष्टीच्या निकषानुसार मंडळामध्ये २४ तासात ६५ मि.मी.पेक्षा जास्त नोंद झालेली असल्यास आणि त्यामुळे मंडळातील गावामध्ये ३३ टक्केपेक्षा जास्त शेतीपिकांचे नुकसान झालेले असल्यास ही मदत अनुज्ञेय राहील.मात्र, ज्या ठिकाणी पूर आलेला असेल त्या ठिकाणी अतिवृष्टीचा निकष लागू राहणार नाही.

४. लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्हयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा. या आदेशाव्दारे तसेच यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाव्दारे नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना दिलेला मदतीचा निधी बँकांनी कर्ज खात्यात अथवा अन्यथा वसुलीसाठी वळती करु नये याकरिता जिल्हाधिकारी यांनी सर्व बँकांना आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात. या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर निधीतून करण्यात येत असलेल्या खर्चाचे लेखे निधी आहरित करण्यात येणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात यावे व करण्यात आलेल्या खर्चाचा कोषागार कार्यालये व महालेखापाल कार्यालयाशी त्रैमासिक ताळमेळ घेण्यात यावा. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून तसेच राज्य शासनाच्या निधीमधून उपलब्ध करून दिलेला उपरोक्त निधी खर्ची पडल्यानंतर तातडीने निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधितांकडून प्राप्त करून घेवून एकत्रितरित्या शासनास सादर करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त यांची राहील.

६. वरील प्रयोजनासाठी प्रधान लेखाशीर्ष २२४५ - नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ०२ पुर चक्रीवादळे इत्यादी अंतर्गत सोबतच्या विवरणपत्रात दर्शविलेल्या लेखाशिर्षाखाली उपलब्ध केलेल्या निधीमधून खर्च करण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२३११३०१२५८४४६२१९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: CN = SANJAY AUDUMBAR DHARURKAR, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = RELIEF AND REHABILITATION DEPARTMENT
Date: 2023.11.30 14:55:04 +05'30'

**( संजय औ. धारूरकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानभवन,मुंबई
५. मा. मंत्री (मदत, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
७. अपर मुख्य सचिव ( वित्त ), मंत्रालय,मुंबई,
८. विभागीय आयुक्त, नाशिक, छ.संभाजीनगर, नागपूर व कोकण
९. सर्व संबंधित जिल्हाधिकारी.
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
११. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
१२. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१३. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
१४. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१५. कार्यासन अधिकारी (म-११/म-३), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१६. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
१७. निवड नस्ती (कार्यासन/ म-३)

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२३/प्र.क्र.१९३/म-३, दि. ३० नोव्हेंबर, २०२३

सोबतचे प्रपत्र

जून ते ऑक्टोबर, २०२३ मध्ये शेतीपिकांच्या व शेत जमिनीच्या झालेल्या नुकसानीकरिता वितरित करावयाच्या निधीचा लेखाशिर्षनिहाय तपशिल

| अ. क्र. | विभाग | बाधित क्षेत्र - हेक्टर | बाधित शेतकरी संख्या | निधी (रु. लक्ष) | शेत जमीनीचे नुकसान बाधित क्षेत्र- हेक्टर | निधी (रु. लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|
| विभागीय आयुक्त, नाशिक यांचा दि.२४.०८.२०२३ चा प्रस्ताव | | | | | | |
| १ | नाशिक | ०.५० | ४ | ०.०६ | ०.०० | ०.०० |
| २ | धुळे | १६१.७० | ३०१ | ३६.३८ | ०.०० | ०.०० |
| ३ | नंदुरबार | ६२४.६५ | ८८४ | १४०.४५ | ०.०० | ०.०० |
| ४ | जळगांव | ५१४४.९२ | ८८३८ | ५९४.७७ | ०.०० | ०.०० |
| ५ | अहमदनगर | २६२.४८ | ४६० | ४५.६६ | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **६१९४.२५** | **१०४८७** | **८१७.३२** | **०.००** | **०.००** |
| विभागीय आयुक्त, छ.संभाजीनगर यांचा दि.१८.०९.२०२३ चा प्रस्ताव | | | | | | |
| १ | नांदेड | ०.०० | ० | ०.०० | ८७२३.४० | ४०८८.३४ |
| २ | लातूर | ०.०० | ० | ०.०० | २३९.०० | ६०.४२ |
| | **एकूण** | **०.००** | **०** | **०.००** | **८९६२.४०** | **४१४८.७६** |
| विभागीय आयुक्त, नागपूर यांचा दि.१२.०९.२०२३ चा प्रस्ताव | | | | | | |
| १ | नागपूर | ११८५.३१ | १४८५ | १३५.६६ | ३९.३५ | १८.५० |
| २ | वर्धा | १२११७.५१ | १९२७७ | १०३०.३२ | १३०.३० | ७०.९४ |
| ३ | भंडारा | २३२९.२५ | ६८४८ | १९८.७७ | ०.०० | ०.०० |
| ४ | गोंदिया | ०.५० | १ | ०.०८ | ०.०० | ०.०० |
| ५ | चंद्रपूर | ५२०१४.१९ | ६३९१४ | ४४२१.२० | १३११.१९ | ८४८.०० |
| ६ | गडचिरोली | ४७१९.९७ | ९०५६ | ५२५.२९ | ५२.९८ | २९.८८ |
| | **एकूण** | **७२३६६.७३** | **१००५८१** | **६३११.३२** | **१५३३.८२** | **९६७.३२** |
| विभागीय आयुक्त, नागपूर यांचा दि.२०.१०.२०२३ चा प्रस्ताव | | | | | | |
| १ | नागपूर | १९५.५० | २६९ | १६.७५ | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **१९५.५०** | **२६९** | **१६.७५** | **०.००** | **०.००** |
| विभागीय आयुक्त, नागपूर यांचा दि.२६.१०.२०२३ चा प्रस्ताव | | | | | | |
| १ | भंडारा | २३८२.०९ | ५३८४ | ३९०.५५ | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **२३८२.०९** | **५३८४** | **३९०.५५** | **०.००** | **०.००** |
| विभागीय आयुक्त, नागपूर यांचा दि.२४.११.२०२३ चा प्रस्ताव | | | | | | |
| १ | नागपूर | १५९.४५ | ३०५ | १३.५५ | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **१५९.४५** | **३०५** | **१३.५५** | **०.००** | **०.००** |
| विभागीय आयुक्त, कोकण यांचा दि.१३.१०.२०२३ चा प्रस्ताव | | | | | | |
| १ | पालघर | ११००.८० | ७१३६ | ९३.९५ | ०.०० | ०.०० |
| २ | रायगड | ९८५७.३६ | २४०९९ | ८४७.१४ | ०.०० | ०.०० |
| ३ | रत्नागिरी | २३५.९४ | ११२८ | २३.०५ | ०.०० | ०.०० |
| ४ | सिंधुदूर्ग | २५०.०७ | २२०४ | ३१.३५ | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **११४४४.१७** | **३४५६७** | **९९५.४९** | **०.००** | **०.००** |
| एकूण राज्य | | ९२७४२.१९ | १५१५९३ | ८५४४.९८ | १०४९६.२२ | ५११६.०८ |